## BOMBAY ACT No. XL OF 1956.

## AN ACT FURTHER TO AMEND CERTAIN BOMBAY LAND TENURES ABOLITION ACTS.

## सन १९५६ चा मुंबईचा अधिनियम ४० वा.

[ राष्ट्रपति यांची मंजुरी मिळाल्यानंतर "मुंबई राजपत्रांत" तारीख १० माहे जुलै सन १९५६ रोजीं प्रथम ( इंग्रजींत ) प्रसिद्ध केलेला. ]

## मुंबईचे जमिनीचे सत्ताप्रकार रद्द करण्यासंबंधींचे विवक्षित अधिनियम आणखी सुधारण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, मुंबई राज्यांतील जमिनीचे सत्ताप्रकार रद्द करण्याची तरतूद करणारे विवक्षित अधिनियम, यांत यापुढें दिलेल्या कारणांसाठीं आणखी सुधारणें इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सातव्या वर्षी यावरून पुढें लिहिल्याप्रमाणें कायदा करण्यांत येत आहे:—

१. या अधिनियमास सन १९५६ चा मुंबईचा जमिनीचे सत्ताप्रकार रद्द करण्याबाबत अधिनियम सुधारण्याबाबत अधिनियम असें म्हणावें. लहान सरनामा.

२. या अधिनियमांत विषयास अगर संदर्भास कांहीं बाध येत नसेल तर— व्याख्या.

(१) "जमिनीचा सत्ताप्रकार रद्द करण्याबाबत अधिनियम" या संज्ञेचा अर्थ, पहिल्या परिशिष्टाच्या आसन १ मध्यें निर्दिष्ट केलेला अधिनियम, असा समजावा ;

(२) ज्या इसमाचे मिळकतींतील हक्क किंवा हितसंबंध, एखाद्या जमिनीचा सत्ताप्रकार रद्द करण्याबाबत अधिनियमाअन्वयें रद्द करण्यांत, नष्ट करण्यांत, किंवा त्यांत फेरफार करण्यांत आले असतील त्या इसमाच्या संबंधांत "संबंधित तारीख" या संज्ञेचा अर्थ, सदरहू अधिनियम ज्या तारखेस अंमलांत आला ती तारीख किंवा सदरहू अधिनियमावरून अशा रीतीनें ( हक्क अगर हितसंबंध) रद्द करणें, नष्ट करणें किंवा त्यांत फेरफार करणें यासाठीं इतर कोणत्याहि तारखेची तरतूद करण्यांत आली असेल तर, त्या अधिनियमाअन्वयेंची अशी इतर कोणतीहि तारीख, असा समजावा ;

(३) "परिशिष्ट" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमास जोडलेलें परिशिष्ट, असा समजावा.

३. (१) जमिनीचे सत्ताप्रकार रद्द करण्याबाबत अधिनियमांपैकीं कोणत्याहि अधिनियमांत कोणताहि मजकूर असला तरीहि, कोणत्याहि इसमाचे मिळकतींतील हक्क किंवा हितसंबंध रद्द करणें, नष्ट करणें किंवा त्यांत फेरफार करणें याबद्दल पहिल्या परिशिष्टाच्या आसन १ मध्यें निर्दिष्ट केलेल्या अधिनियमांचे त्याच्या २ ऱ्या आसनांत निर्दिष्ट नुकसान-भरपाईच्या रकमेतून जमीनमह-सुलाच्या

थकबाकीच्या रकमा वगैरे वजा करणें.

केलेले ठरावं याअन्वयें राज्य सरकारनें अशा इसमास नुकसानभरपाई म्हणून दिलेली किंवा इतर रीतीनें देण्याजोगी रक्कम ही, पोट-कलम (२) मध्यें तरतूद केल्याप्रमाणें तींतून रकमा वजा केल्या जाण्यास पात्र राहून अशा इसमास देण्याजोगी असेल.

(२) अशा रकमेपैकीं एक-तृतियांश रकमेंतून पुढील रकमा वजा केल्या पाहिजेत व राज्य सरकारकडे जमा केल्या पाहिजेत,—

(अ) अशा मिळकतीच्या संबंधांतील जमीनमहसुलांतील थकबाकी, सेस व इतर देणीं यांच्या संबंधित तारखेपूर्वीच्या कोणत्याहि मुदतीकरितां अशा इसमाकडून येणें असल्याविषयीं कलेक्टरनें दाखला दिलेल्या रकमा;

(ब) संबंधित तारखेस फेड करण्यायोग्य झाल्याचा कलेक्टरनें दाखला दिली असेल अशी राज्य सरकारनें दिलेल्या कोणत्याहि कर्जाची सबंध रक्कम किंवा तिचा भाग, त्यावरील व्याजासह, कांहीं असल्यास, आणि

(क) अशा इसमास लागू असलेल्या जमिनीच्या सत्ताप्रकार रद्द करण्याबाबत अधिनियमाच्या संबंधित ठरावाअन्वयें अशा इसमानें राज्य सरकारला देण्याजोगी भोगवटयाच्या किमतीची रक्कम, कोणतीहि असल्यास.

(३) मागील पोट-कलमांचे ठराव हे, त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या इतर कोणत्याहि कायद्याच्या ज्या ठरावांअन्वयें वजा करावयाची रक्कम वसूल करण्याजोगी असेल त्या ठरावांव्यतिरिक्त असतील व त्यांवरून (त्या कायद्याच्या) ठरावांचें महत्त्व कमी होणार नाहीं.

दुसऱ्या परिशिष्टांत निर्दिष्ट केलेल्या अधिनियमांची सुधारणा.

४. दुसऱ्या परिशिष्टाच्या १ ल्या आसनांत निर्दिष्ट केलेल्या अधिनियमांची त्या परिशिष्टाच्या २ ऱ्या आसनांत दिलेल्या रीतीनें व मर्यादेपर्यंत सुधारणा केली पाहिजे.

## परिशिष्ट १ लें.

(कलमें २ व ३ पहा.)

| अधिनियम. | ठराव. |
|---|---|
| १ | २ |
| १. सन १९४९चा मुंबईचा मलेकी सत्ताप्रकार रद्द करण्याबाबत अधिनियम (सन १९४९चा मुंबईचा अधिनियम ६१वा). | कलम ५. |
| २. सन १९४९चा मुंबईचा तालुकदारी वहिवाट रद्द करण्याबाबत अधिनियम (सन १९४९चा मुंबईचा अधिनियम ६२वा). | कलमें ७ व १४. |

PART VIII] TH

३. सन १९४९चा
(सन१९५० चा
४. सन १९५० चा मुं
अधिनियम (सन १
५. सन १९५०चा मुंबई
नियम (सन १९५०
६. सन १९५१चा सार्व
विषयीं) अधिनियम
७. सन १९५२चा मुंबई
सुधारण्याबाबत अधि
८. सन १९५२चा
(सन १९५३ चा मुं
९. सन १९५३चा मुंबईचा
करण्याबाबत अधिनि
१०. सन १९५३चा मुंबई
अधिनियम (सन १९
११. सन १९५३चा मुंब
सत्ताप्रकार रद्द करण
अधिनियम४९वा).
१२. सन १९५३चा मुंबई
रद्द करण्यासंबंधीं) अ
१३. सन १९५३चा मुंबई
करण्याबाबत अधिनिय
१४. सन १९५३चा मुंबईच
बाबत अधिनियम (
१५. सन १९५३चा मुंबई
सत्ताप्रकार रद्द करण
अधिनियम ७१ वा).
१६. सन १९५३चा मुंब
(जहागिऱ्या रद्द करण
अधिनियम ३९ वा).
१७. सन १९५५चा मुंबईच
(सन १९५५ चा मुंबई
१८. सन १९५५चा मुंबईच
रद्द करण्याबाबत अधिनि

| अधिनियम. १ | ठराव. २ |
|---|---|
| ३. सन १९४९चा मुंबईचा खोती रद्द करण्याबाबत अधिनियम (सन१९५० चा मुंबईचा अधिनियम ६वा). | कलम १२. |
| ४. सन १९५० चा मुंबईचा परगणा व कुळकर्णी वतनें (रद्द करण्याबाबत) अधिनियम (सन १९५० चा अधिनियम ६०वा). | कलमें ६, ७ व ९. |
| ५. सन १९५०चा मुंबईचा वटवा वजिफदारी हक्क रद्द करण्याबाबत अधिनियम (सन १९५०चा मुंबईचा अधिनियम ६२वा). | कलम ४. |
| ६. सन १९५१चा साष्टी इस्टेटींबाबत (जमीन महसुलाची माफी रद्द करण्याविषयीं) अधिनियम (सन१९५१चा मुंबईचा अधिनियम ४७ वा). | कलम ७. |
| ७. सन १९५३चा मुंबईचा ज़मिनीचे सत्ताप्रकार रद्द करण्याबाबत अधिनियम सुधारण्याबाबत अधिनियम (सन १९५३चा मुंबईचा अधिनियम ३८वा). | कलम २. |
| ८. सन १९५२चा मुंबईचा जातइनाम रद्द करण्याबाबत अधिनियम (सन १९५३ चा मुंबईचा अधिनियम ४२वा). | कलमें ६, १० व १७. |
| ९. सन १९५३चा मुंबईचा विलीन प्रदेशांतील आंकड़िया सत्ताप्रकार रद्द करण्याबाबत अधिनियम (सन १९५३चा मुंबईचा अधिनियम ४३ वा). | कलमें ६ व ७. |
| १०. सन १९५३चा मुंबईचा कौली व कटुबाण सत्ताप्रकार रद्द करण्याबाबत अधिनियम (सन १९५३चा मुंबईचा अधिनियम ४४वा). | कलम ७. |
| ११. सन १९५३चा मुंबईचा विलीन प्रदेशांबाबत (बडोदें मूळगिरास सत्ताप्रकार रद्द करण्यासंबंधीं) अधिनियम (सन १९५३चा मुंबईचा अधिनियम ४९वा). | कलमें ५, ८ व १५. |
| १२. सन १९५३चा मुंबईचा विलीन प्रदेशांबाबत (बडोदें संस्थानांतील वतनें रद्द करण्यासंबंधीं) अधिनियम (सन १९५३चा मुंबईचा अधिनियम४६वा). | कलमें ५, ६ व ८. |
| १३. सन १९५३चा मुंबईचा विलीन प्रदेशांतील मतादारी सत्ताप्रकार रद्द करण्याबाबत अधिनियम. (सन १९५३चा मुंबईचा अधिनियम ४८ वा). | कलमें ६, ७ व ८. |
| १४. सन १९५३चा मुंबईचा (समाजास उपयुक्त) चाकरी इनामें रद्द करण्याबाबत अधिनियम (सन १९५३चा मुंबईचा अधिनियम ७० वा). | कलमें ६ व ७. |
| १५. सन १९५३चा मुंबईचा विलीन प्रदेशांतील (जंजिरा व भोर) खोती सत्ताप्रकार रद्द करण्याबाबत अधिनियम (सन १९५३ चा मुंबईचा अधिनियम ७१ वा). | कलम १४. |
| १६. सन १९५३चा मुंबईचा विलीन झालेले मुलूख व प्रदेश यांबाबत (जहागिऱ्या रद्द करण्यासंबंधीं) अधिनियम (सन १९५४चा मुंबईचा अधिनियम ३९ वा). | कलमें ११, १२, १३ व १४. |
| १७. सन १९५५चा मुंबईचा भिल्लनाईक इनामें रद्द करण्याबाबत अधिनियम (सन १९५५ चा मुंबईचा अधिनियम २१ वा). | कलम ७. |
| १८. सन १९५५चा मुंबईचा विलीन प्रदेशांतील किरकोळ दुमाला वहिवाटी रद्द करण्याबाबत अधिनियम (सन १९५५चा मुंबईचा अधिनियम २२वा). | कलमें १४, १५, १६ व १८. |

## परिशिष्ट २ रें.

(कलम ४ पहा.)

| अधिनियम.<br>१ | सुधारणा.<br>२ |
|---|---|
| १. सन १९४९चा मुंबईचा मलेकी सत्ताप्रकार रद्द करण्याबाबत अधिनियम (सन १९४९ चा मुंबईचा अधिनियम ६१वा). | कलम ४चें पोट-कलम (२) हें गाळण्यांत यावें. |
| २. सन १९५२चा मुंबईचा जात इनाम रद्द करण्याबाबत अधिनियम (सन १९५३चा मुंबईचा अधिनियम ४२ वा). | कलम २, पोट-कलम (१), रकम (इ) हिच्या खुलाशांत "अखेरचा असेल" या शब्दानंतर "आणि कोडाच्या ५३ व्या कलमाअन्वयें ठेवलेल्या दुमाला जमिनींच्या रजिस्टरांत अशा देणगीच्या संबंधांत कोणतीहि नोंद असल्यास ती त्याप्रमाणें सुधारण्यांत आली आहे असें समजलें पाहिजे" हा मजकूर दाखल करण्यांत यावा व तो नेहमीं दाखल करण्यांत आला होता असें समजलें पाहिजे.<br><br>(२) कलम ३ मध्यें शेवटीं पुढील खुलासा दाखल करण्यांत यावा व तो नेहमीं दाखल करण्यांत आला होता असें समजलें पाहिजे :—<br><br>"खुलासा.—ह्या कलमाच्या कारणांकरितां धार्मिक किंवा धर्मादाय संस्थांनीं धारण केलेलीं इनामें म्हणजे धार्मिक किंवा धर्मादाय संस्थेसाठीं त्यावेळच्या शासनाधिकाऱ्यानें दिलेलीं किंवा मान्यता दिलेलीं आणि कोडाच्या ५३ व्या कलमाअन्वयें ठेवलेल्या दुमाला जमिनींच्या रजिस्टरांत किंवा सन १८७१ चा पेन्शनांबाबत अधिनियम याअन्वयें केलेल्या नियमांनुसार ठेवलेल्या दफ्तरांत तशीं इनामें म्हणून दाखल केलेलीं देवस्थान किंवा धर्मादाय इनामें होत." |
| ३. सन १९५३चा मुंबईचा विलीन प्रदेशांतील मतादारी सत्ताप्रकार रद्द करण्याबाबत अधिनियम (सन १९५३चा मुंबईचा अधिनियम ४८ वा). | कलम ३ मध्यें शेवटीं पुढील खुलासा दाखल करण्यांत यावा व तो नेहमीं दाखल करण्यांत आला होता असें समजलें पाहिजे :—<br><br>"खुलासा.—ह्या कलमाच्या कारणांकरितां धार्मिक किंवा धर्मादाय संस्थांनीं धारण केलेलीं इनामें म्हणजे धार्मिक किंवा धर्मादाय संस्थेसाठीं त्यावेळच्या शासनाधिकाऱ्यानें दिलेलीं किंवा मान्यता दिलेलीं आणि मतादारी इस्टेटींत याबाबत ठेवलेल्या दफ्तरांत तशीं इनामें म्हणून दाखल केलेलीं देवस्थान किंवा धर्मादाय इनामें होत." |

| अधिनियम.<br>१ | सुधारणा.<br>२ |
| --- | --- |
| ४. सन १९५३ चा मुंबईचा विलीन झालेले मुलूख व प्रदेश यांबाबत (जहागिऱ्या रद्द करण्यासंबंधीं) अधिनियम (सन १९५४ चा मुंबईचा अधिनियम ३९ वा). | कलम ४ मध्यें शेवटीं पुढील खुलासा जादा दाखल करण्यांत यावा व तो नेहमीं दाखल करण्यांत आला होता असें समजलें पाहिजे :—<br>" खुलासा.—ह्या कलमाच्या कारणांकरितां धार्मिक किंवा धर्मादाय संस्थेसाठीं धारण केलेलें इनाम म्हणजे धार्मिक किंवा धर्मादाय संस्थेसाठीं विलिनीकरणापूर्वी त्यावेळच्या शासनाधिकाऱ्यानें दिलेलें किंवा देणगी म्हणून मान्यता दिलेलें आणि विलिनीकरणापूर्वी संबंधित भारतीय संस्थानांत याबाबत ठेवलेल्या दफ्तरांत तसें इनाम म्हणून दाखल केलेलें इनाम होय. " |
| ५. सन १९५५ चा मुंबईचा भिल्ल-नाईक इनामें रद्द करण्याबाबत अधिनियम (सन १९५५ चा मुंबईचा अधिनियम २१ वा). | कलम ३ मध्यें शेवटीं पुढील खुलासा दाखल करण्यांत यावा व तो नेहमीं दाखल करण्यांत आला होता असें समजलें पाहिजे :—<br>" खुलासा.—ह्या कलमाच्या कारणांकरितां धार्मिक किंवा धर्मादाय संस्थेसाठीं धारण केलेलें इनाम म्हणजे धार्मिक किंवा धर्मादाय संस्थेसाठीं त्या वेळच्या शासनाधिकाऱ्यानें दिलेलें किंवा मान्यता दिलेलें आणि कोडाच्या ५३ व्या कलमाअन्वयें ठेवलेल्या दुमाला जमिनींच्या रजिस्टरांत किंवा सन १८७१ चा पेन्शनांबाबत अधिनियम याअन्वयें केलेल्या नियमांनुसार ठेवलेल्या दफ्तरांत तसें इनाम म्हणून दाखल केलेलें इनाम होय. " |
| ६. सन १९५५ चा मुंबईचा विलीन प्रदेशांतील किरकोळ दुमाला बहिवाटी रद्द करण्याबाबत अधिनियम (सन १९५५ चा मुंबईचा अधिनियम २२ वा). | कलम ३ मध्यें,—<br>(१) पोट-कलम (१) ची रकम (ब) ह्हिच्या बदला पुढील रकम दाखल करावी व ती नेहमीं दाखल करण्यांत आली होती असें समजलें पाहिजे :—<br>" (ब) वतन खेरीजकरून विलिनीकरणापूर्वी त्यावेळच्या शासनाधिकाऱ्यास उपयुक्त असलेल्या आणि विलिनी-करणानंतर राज्य सरकारास उपयुक्त असण्याचें चालू राहिलेल्या चाकरीबद्दल धारण केलेल्या दुमाला देणग्या. "<br>(२) पोट-कलम (२) नंतर पुढील खुलासा दाखल करण्यांत यावा व तो नेहमीं दाखल करण्यांत आला होता असें समजलें पाहिजे :—<br>" खुलासा.—ह्या कलमाच्या कारणांकरितां धार्मिक किंवा धर्मादाय संस्थेनें धारण केलेलें इनाम म्हणजे धार्मिक किंवा धर्मादाय संस्थेसाठीं विलिनीकरणापूर्वी त्यावेळच्या शासनाधिकाऱ्यानें दिलेलें किंवा देणगी म्हणून मान्यता दिलेलें आणि विलिनीकरणापूर्वी संबंधित भारतीय संस्थानांत याबाबत ठेवलेल्या दफ्तरांत तसें इनाम म्हणून दाखल केलेलें इनाम होय. " |

(True translation)

J. H. DAVE,

Examiner of Books and Publications, Bombay.